नियमीत फौ. ख.क्र. ४६२/२०२१

सरकार विरुध्द प्रमोद वगैरे

निशाणी क्र.३५

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०१) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांवः– प्रयागाबाई अर्जुन दहिफळे,

वय सुमारेः– ६२ वर्ष, व्यवसायः–सेवानिवृत्त

निवासस्थानः–पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

## अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.

दि. ०४.०७.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता पोलिस हे पंचायत समिती येथे आले होते. त्यावेळेस मी पाथर्डी पंचायत समिती येथे नोकरी करीत होते. पंचनाम्यासाठी मी, ससाणे व गोल्हार पोलिस असे होते. घटनास्थळ हे मला कोणी दाखवले हे आठवत नाही. पोलिसांनी त्या ठिकाणी पंचनामा केला. परंतु त्या ठिकाणी काय होते हे मला सांगता येणार नाही. आता मला दाखविणेत आलेला पंचनामा तोच असून त्यावर माझी अ. क्र. ०२ ची सही आहे. परंतु त्यातील मजकूर मलामाहित नाही. **घटनास्थळ पंचनाम्यावरील अ. क्र. ०२ चे सहिस निशाणी ३६** देण्यात येते.

(साक्षीदार पुर्वीच्या जवाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ... सबब ती देण्यात आली.)

हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामावरील सही निशाणी ३६ ही त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याने मी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे असल्याने मी त्यांना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

## उलट तपासणी

## आरोपीकरिता श्री. एस. के. आंधळे वकील यांनी नाकारला.

... फेर तपास ... काही नाही.

दिनांकः २३.०९.२०२५.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.09.23 17:28:47 +0530

**(रविकिरण सपाटे )**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पाथर्डी जि. अहमदनगर.